दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२८ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thursday 28 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 13 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## उद्धव ठाकरे राज ठाकरेंच्या निवासस्थानी:अर्धा तास चर्चा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या घरी जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. राज ठाकरे यांनी शिवसेना पक्ष सोडल्यानंतर तब्बल २० वर्षांनी उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या घरी गेले. उद्धव ठाकरे यांनी शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी सहकुटुंब जात गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी आदित्य ठाकरे तसेच रश्मी ठाकरे उपस्थित होत्या.

उद्धव ठाकरे यांना राज ठाकरे यांनी फोन करत गणपती दर्शनाचे निमंत्रण दिले होते. त्याला सकारात्मक उत्तर दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी शिवतीर्थ गाठले होते. यावेळी दोन्ही कुटुंबात स्नेहभोजन देखील झाले. तसेच समोर आलेल्या माहितीनुसार उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या दोघांमध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. तसेच स्नेहभोजन करत असताना देखील सगळे सोबतच होते. त्यामुळे आता पुन्हा एकदा युतीच्या चर्चांना उधाण येऊ शकते.मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही बंधू विजयी मेळावा घेत एकत्र आले होते. त्यानंतर २७ जुलै रोजी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसासच्या निमित्ताने राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जात त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधूंमध्ये जवळीक वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दोन्ही नेते युती करणार असल्याचे बोलले जात आहे.आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने एकत्र येणार का? असा अनेकवेळा प्रश्न विचारण्यात अल असला तरी देखील दोन्ही नेत्यांनी योग्य वेळी भूमिका घेऊ असे उत्तर दिले आहे. परंतु, वारंवार होणाऱ्या भेटीमागे केवळ कौटुंबिक कारण आहे की राजकारण आहे, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. मात्र, अद्याप तरी त्यांनी अधिकृत युतीची घोषणा केलेली नाही. परंतु, आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने दोन्ही नेते एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त मोफत आरोग्य तपासणी व औषधी वाटप



**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या नरसी शहरातील आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेले अश्विनी क्लिनिकच्या रोपे महोत्सवी वर्षानिमित्त डॉक्टर शिवकुमार संगय्या जुक्कलकर यांच्यावतीने आज दिनांक २७ ऑगस्ट रोजी आरोग्य तपासणी व मोफत औषधी वाटप करण्यात आली तसेच थायरॉईड तपासणी ब्लड तपासणी यास अन्य तपासण्या करण्यात आल्या यावेळी नांदेड येथील विशेष तज्ञ डॉक्टरची टीम उपस्थित होती कार्यक्रमाची सुरुवात आरोग्य देवता धन्वंत्रेची पूजा आरती करून झाली यावेळी नांदेड येथील मान्यवर वैद्यकीय टीम नंदकिशोर कोरे पांडुरंग विठ्ठल नारलावार संतोष सावकार जुक्कलकर पांडुरंग नारळावर ज्ञानेश्वर कोरे देशवार साईनाथ मद्रेवार मनोज दमसेटवर यासह शहर परिसरातील रुग्ण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत रामपालजी महाराजांची प्रतिमा मलिन करण्याचा कट उघडकीस

**नंदुरबार । दिपक गोसावी**

संत रामपालजी महाराजांची प्रतिमा मलिन करण्यासाठी काही असामाजिक तत्वांनी रचलेला कट उघडकीस आला आहे. त्यांच्या शिष्यांनी कोल्हापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शिष्यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत समाजाला अशा खोटया बातम्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून समाजात एक खोटी बातमी पसरवली जात होती की संत रामपालजी महाराज ८ सप्टेंबर २०२५ रोजी आपल्या अनुयायांना सोबत घेऊन देहत्याग करून सतलोकास जातील. संत रामपालजी महाराजांच्या शिष्यांनी हा दावा पूर्णपणे खोटा असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या मते, ही बातमी निराधार असून, महाराजांच्या मूळ शिकवणुकीच्या विरोधात आहे. संत रामपालजी महाराज नेहमीच सांगतात की मानवी जीवन हे परमेश्वराचे अमूल्य दान आहे आणि आत्महत्या हे पाप आहे.

या प्रकरणात ज्या इरकर कुटुंबाचा उल्लेख करण्यात आला होता, त्यांनी स्वतः माफी मागून हे षडयंत्र असल्याचे मान्य केले आहे. काही स्वार्थी लोकांनी संत रामपालजी महाराजांची वाढती प्रतिष्ठा पाहून हा कट रचल्याचे त्यांनी सांगितले.

शिष्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संत रामपालजी महाराज गेल्या अनेक वर्षांपासून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत आहेत. नशामुक्त समाज, हुंडामुक्त विवाह, स्त्री-पुरुष समानता, भ्रूणहत्येला विरोध, धार्मिक सौहार्द आणि शिक्षणाचा प्रसार यांसारख्या कार्यांतून ते समाजाला योग्य दिशा देत आहेत. त्यांचे प्रवचन गीता, वेद, कुराण आणि बायबल यांसारख्या पवित्र ग्रंथांवर आधारित असून, लाखो लोक त्यांच्या शिकवणीचा लाभ घेत आहेत. राष्ट्रीय टीव्ही चॅनेल्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचे सत्संग कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचत आहेत.

संत रामपालजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली 'अन्नपूर्णा मोहीम' राबवली जाते. या मोहिमेअंतर्गत सतलोक आश्रमाकडून गरीब आणि गरजू लोकांना मोफत धान्य, घरे, औषधे आणि मुलांच्या शिक्षणासाठी मदत पुरवली जाते. ही योजना केवळ अन्नपुरवठ्यापुरती मर्यादित नसून, समाजकल्याणाचा एक व्यापक उपक्रम असल्याचे शिष्यांनी नमूद केले.

शिष्यांनी सर्वसामान्य जनता, प्रसारमाध्यमे आणि प्रशासनाला आवाहन केले आहे की अशा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये. भविष्यात पुन्हा कोणी अशा प्रकारे महाराजांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## नायगांव शहरातील मानाच्या गणरायाची खासदारांच्या उपस्थितीत स्थापना

### ५० वर्षाची अखंड परंपरा कायम

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नायगाव शहरातील मार्केट यार्ड येथील नवसाला पावणारा म्हणून ओळख असलेल्या गणरायाची दिनांक २७ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थापना करण्यात आली श्री गणरायांची पालखीत वाजत गाजत मार्केट यार्ड मध्ये पारंपारिक पद्धतीने १९७५ पासून चालत असलेली अखंड परंपरा जोपासत आज स्थापना झाली गणरायाची पूजा आरती आधी कार्यक्रमाने ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत स्थापना करण्यात आली यावेळी नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार रवींद्र पाटील चव्हाण तंटामुक्त समितीचे तालुकाध्यक्ष हनुमंतराव पाटील चव्हाण नायगाव नगरपंचायत चे नगर उपाध्यक्ष विजय पाटील चव्हाण खरेदी विक्री संघ चेअरमन श्रीनिवास पाटील चव्हाण माजी जि प सदस्य संजय आप्पा बेळगे नायगाव नगरपंचायतचे नगराध्यक्ष प्रतिनिधी संजय पाटील चव्हाण ब्रह्मानंद देसाई देविदास पाटील



बोमनाळे भगवान पाटील लंगडा पुरे बाबुराव पाटील लंगडापुरे प्राध्यापक जीवन पाटील नगरसेवक पांडुरंग पाटील चव्हाण सामाजिक कार्यकर्ते माणिक दादा चव्हाण प्रसिद्ध उद्योजक वसंत सावकार मेडेवार चंद्रकांत सावकार कौतिक वार बाबू सावकार अरगुलवार संगमनेर सावकार कवटीकवार आर्य वैश्य महासभेचे तालुकाध्यक्ष सतीश सावकार मेडेवार साईनाथ मेडेवार श्रीनिवास गडपल्लेवार गजानन चौधरी पत्रकार शंकर पाटील लाब्दे साईनाथ वसंत सावकारी कौतिक वार बालाजी मेडेवार संगमनाथ सावकार गंदेवार विनोद गंजेवार सूर्यकांत कवटीकवार कैलास कवटीकवार सचिन सावकार चिद्रावार सूर्यकांत उपलंचवार गंगाधर पाटील कल्याण नरेश आरगुलवार अनिल चिंतावार, शंकर चव्हाण, गणेश पाळेकर, प्रल्हाद बोमनाळे, संजय बोमनाळे यासह नायगाव शहरातील हजारो भाविक भक्त उपस्थित होते .

## अंबाजोगाई तालुक्यात महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना गठीत-डी.जी.तांदळे



**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई सेवानिवृत्तांचे महाराष्ट्र राज्य पातळीवरील स्थापित,नोंदणीकृत संघटन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत अधिकारी कर्मचारी संघटना, शाखा जिल्हा बीडच्या अंतर्गत अंबाजोगाई तालुक्यात दि.२६ ऑगस्ट,२०२५ रोजी अध्यक्ष सुरेश खंदारे,सचिव शंकर बुरांडे व कार्याध्यक्ष रामलींग मुंडे यांच्या नेतृत्वा खाली सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांची तालुका शाखा गठीत केली असल्याची माहिती जिल्हा कार्यकारीणीचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी.तांदळे यांनी दिली आहे. यासंबंधाने अधिक तपशील असा की,मा.अरुण बोंगीरवार , अरविंद इनामदार व मा.र.ग.कर्णिक यांनी स्थापन केलेले हे संघटन आता चंद्रकांत दळवी,मनोहर पोकळे,मा. उमाकांत दांगट यांचे राज्य पातळीवर तर बीड जिल्ह्यात जालिंदर भोरे,कांचन गायकवाड , गौतम चोपडे यांचे पुढाकाराने कार्यरत आहे.अंबा नगरीत विविध विभागातून सेवा निवृत्त झालेले अधिकारी,प्राचार्य, डॉक्टर,प्राध्यापक ,शिक्षक व कर्मचारी यांच्या प्रचंड उपस्थितीत तालुका अध्यक्षपदी सुरेश खंदारे,सचिव शंकर बुरांडे,कार्याध्यक्ष रामलींग मुंडे,उपाध्यक्ष डॉ एस.व्ही. माने व एस.एस. हजारे,सहसचिव ए.एस.तट ,कोषाध्यक्ष एस.पी. आव्हाड,संघटक ए एस सय्यद,प्रसिद्धी प्रमुख पी.एन.पाखरे,आणि मार्गदर्शक व्ही.आर.कराड व डी बी जोगदंड यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.बैठकीचे अध्यक्ष स्थान आर.एन.मुंडे यांनी भुषविले. संघटनेची ध्येयधोरणे, उद्देश ,कार्यक्रम,कार्य पद्धती, सदस्य नोंदणी, आरोग्य, समुपदेशन यासबंधाने सभेला जिल्हाध्यक्ष जालिंदर भोरे,सरचिटणीस कांचन गायकवाड,उपाध्यक्ष एन. बी.चौरे,मार्गदर्शक प्राचार्य डी.जी.तांदळे यांनी संबोधित केले. प्रास्ताविक व सुत्र संचलन जिल्हा कार्याध्यक्ष गौतम चोपडे यांनी केले. उपस्थितांचे आभार शंकर बुरांडे यांनी मानले.

## शहरात घरोघरी गणरायाचे उत्साहात आगमन,सार्वजनिक गणेश मंडळांनी वाजत गाजत केली श्री ची स्थापना

**केज । प्रतिनिधी**

गणेश चतुर्थी निमित्ताने यावर्षी देखील केज शहरामध्ये गणरायाचे आगमन अगदी थाटामाटात झाले.हिंदु संस्कृतीमध्ये ऑगस्ट महिना प्रामुख्याने सण उत्सवाचा असतो. रक्षाबंधन झाले की, ऑगस्ट महिन्यात येणारा उत्साहाचा व आनंदाचा सण म्हणजे गौरी गणपती उत्सव यावर्षी दि.२७ आगष्ट २०२५ बुधवार रोजी घरोघरी गणपती बाप्पा चे आगमन आनंदात व मोठ्या उत्साहात झाले. गल्लोगल्ली मध्ये, घरोघरी लहान मुले व स्त्री पुरुषांची बाजारात जावून घरी गणपती बाप्पाची मुर्ती आणण्या साठी लगबग दिसून येत होती.केज शहरामध्ये बाजारपेठेत गणपती च्या आकर्षक व सुरेख मुर्ती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने बाजारपेठेत खरेदी साठी लोकांची गर्दी दिसून येत होती. शहरातील लोकांनी आनंदी



वातावरणात भक्तीभावाने गणरायाची घरोघरी स्थापना केली. यावर्षी गणपती बाप्पा चा दहा दिवसांचा मुक्काम असून अकराव्या दिवशी अनंत चतुर्दशीला विसर्जन होणारआहे.सार्वजनिक गणेश मंडळांनी ही विविध प्रकारचे देखावे सादर करण्याची तयारी केली असुन वाजत गाजत बाप्पाची मंडपात स्थापना केली आहे.

## राजुरा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मुख्यमंत्री व मंत्र्यांकडे आमदार देवराव भोंगळे यांचा पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा मतदारसंघातील विकासात्मक व जनहिताचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आमदार देवराव भोंगळे यांनी मुंबई मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्र्यांची भेट घेतली. कॅबिनेट बैठकीच्या निमित्ताने झालेल्या या चर्चेत मतदारसंघातील महत्त्वाच्या मागण्या त्यांनी मांडल्या.आमदार भोंगळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना अलीकडेच विरूर स्टेशन येथे झालेल्या महाआरोग्य शिबिराची तसेच राजुरा, गोंडपिपरी, कोरपना, गडचांदूर, जिवती व नांदा येथे आमचा देवाभाऊ रक्षाबंधन सोहळ्याचा अहवाल सादर केला. यावेळी गोंडपिपरी तालुक्यातील एमआयडीसीअंतर्गत ४३०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी झालेल्या सामंजस्य कराराबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.गोंडपिपरी ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाला हायपावर कमिटीची मान्यता मिळावी, तसेच राजुरा शहरातील मुख्य मार्गावरील परवानगीशिवाय तोडण्यात आलेल्या जांभळी व चिचवा या झाडांप्रकरणी कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. याचबरोबर, राजुरा-चुनाळा-धानोरा-अंतरगाव-अन्नुर या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेऊन एडीबी अंतर्गत तातडीने निधी मंजूर करावा, अशी विनंतीही त्यांनी केली.



राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिवती तालुक्यातील वनजमीन पट्ट्यांचा प्रश्न, सिमावर्ती १४ गावांचा प्रश्न, राजुरा शहरातील देशपांडेवाडीतील वर्ग २ प्रकरण तसेच जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अग्रिस्टाक आयडीसंदर्भात शिथिलता देण्याची मागणी त्यांनी केली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांना संगणकीकृत सातबारा नोंदी नसल्याने हस्तलिखित सातबाऱ्यावरच कपास किसान अप्लिकेशन वर नोंदणी करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली.तसेच, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन जिवती ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी अंदाजपत्रकालाप्रशासकीय मान्यता मिळावी, अशी मागणी आमदार भोंगळे यांनी केली. या सर्व विषयांवर मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिल्याने मतदारसंघातील प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास आमदार देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

# सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच राष्ट्राला संबोधित करताना या वर्षाअखेर देशातील पहिली सेमीकंडक्टर चिप उत्पादित होणार असल्याची घोषणा केली. आतापर्यंत परदेशातून सेमीकंडक्टर आयात करून भारताची गरज भागविली जात होती. दहा वर्षांत सेमीकंडक्टर उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याचा भारताचा निर्धार असून सेमीकंडक्टर निर्यात करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत, तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५च्या अखेरीस ‘मेड इन इंडिया ’सेमीकंडक्टर चिप्स’ बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन–आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही खूप उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाइल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. या देशातील ‘टीएसएमसी’ या कंपनीचा चिप मार्केटमध्ये सुमारे ५० टक्के वाटा आहे. मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. सॅमसंग, एसके हायनिक्स यांसारख्या कंपन्या यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करत आहे. ‘मीडिया रिपोर्टस’नुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५–२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकादेखील या क्षेत्रात सतत गुंतवणूक करत आहे.सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे शंभर टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. त्यात तैवान हा सर्वात मोठा पुरवठादार आहे. त्यानंतर चीन, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि मलेशियाचा क्रमांक लागतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४–२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे, ज्याचा अमेरिकेच्या एकूण सेमीकंडक्टर आयातीत ७.२ टक्के वाटा आहे. भारत अर्धवाहक उत्पादन आणि नवोपक्रमाचे जागतिक केंद्र बनण्याचे स्वप्न पाहतो, जेणेकरून आयात कमी होईल आणि पुरवठा साखळी मजबूत होईल आणि देशांतर्गत क्षमता वाढेल. सरकारने ‘सेमीकॉन इंडिया प्रोग्राम’ अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात दहा प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे ६ प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल–फॉक्सकॉन, मायक्रॉन, वेदांत–फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५च्या अखेरीस ‘मेड इन इंडिया’ सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करत आहे. भारत सरकार ‘सेमिकॉन इंडिया फ्युचर स्किल्स टॅलेंट कमिटी’च्या अहवालाकडे लक्ष ठेवून आहे. त्यात म्हटले आहे, की २०३२ पर्यंत ‘व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन’ चिप डिझाइन क्षेत्रात अंदाजे २,७५,००० अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. इतकेच नाही तर, पुढील दहा वर्षांमध्ये फॅब आणि असेंब्ली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग सुविधांसाठी अनुक्रमे २५ हजार आणि २९ हजार कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दरवर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलीकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. अहवालात दावा करण्यात आला आहे, की भारतात दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाइनमध्ये बरीच प्रगती केली आहे, परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाइन सेवांमध्ये गुंतले आहेत, तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. संपूर्ण अर्धवाहक मूल्य साखळीसाठी हे कौशल्य आवश्यक आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो.भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे दहा टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञानाच्या मूलभूत गोष्टी समजून घेऊन, विद्यार्थी अर्धवाहक उपकरणे, उत्पादन प्रक्रिया, डिझाइन तंत्रे एक्सप्लोर करण्यासाठी तयार होऊ शकतो. नॅनोटेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स आणि सर्किट डिझाइन यांसारख्या विशिष्ट क्षेत्रातही हळूहळू पुढे जाऊ शकतो. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचवले आहे. हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने, कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. ‘मेक इन इंडिया’अंतर्गत ‘इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग’, ‘इंडिया सेमीकंडक्टर मिशन’ आणि ‘सेमीकॉन इंडिया प्रोग्राम’ यांसारख्या प्रमुख क्षेत्रांपैकी एक म्हणून उपक्रमांनी उद्योगाला आधार देण्यासाठी एक परिसंस्था तयार करण्यास मदत केली आहे. नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाइन सुविधा केंद्रांचे उद्घाटन झाले. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत ३ नॅनोमीटर चिप डिझाइनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या ‘डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह’ योजनेअंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या ‘चिप्स टू स्टार्टअप्स’ कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलीकडेच ‘स्मार्ट व्हिजन’, सीसीटीव्ही कॅमेरे आणि ‘इंटरनेट ऑफ थिंग्ज’सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाइन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली.

मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये ‘डीएलआय’ योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाइन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे. याव्यतिरिक्त, पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाइन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाइन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली आहे.

# श्रीगणेश विघ्नहर्ता व बुद्धीमत्तेचे अथांग महासागर



संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा–अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी–देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ–लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती–पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला वेगवेगळ्या देवी–देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा–अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला.लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा–अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा,बेल–फुल,शम्मीपत्र, शेंदूर यांचा वापर होतो.भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ–मोठी मंदिरे आहेत.त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला देवी–देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा – महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल.गणपती बाप्पा मोरया!

**–रमेश कृष्णराव लांजेवार**

# कोकण विभागातील उद्योजकांना वैध मापन शास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन आणि चर्चासत्र



**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत वैध मापन शास्त्र कोकण विभागाच्या वतीने कोकण विभागातील ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयातील उद्योग व आयातदार आस्थापनांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शन सत्रात महाराष्ट्र राज्य वैध मापन शास्त्र, मुंबईचे नियंत्रक सुधाकर तेलंग (भा. प्र. से.) यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास वैध मापन शास्त्र, कोकण विभागाचे सहनियंत्रक शिवाजी काकडे, इतर वरिष्ठ अधिकारी तसेच रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील सर्व औद्योगिक उत्पादन/आयातदार आस्थापनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उत्पादक व आयातदारांनी उत्पादित/आयातीत वस्तूंवर बंधनकारक असणाऱ्या माहितीचे विवरण, विक्री प्रक्रियेत होणाऱ्या अडचणी व ग्राहकांच्या तक्रारींबाबत चर्चा करण्यात आली.

वैध मापन शास्त्र अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र नियम २०११ यानुसार सर्व उत्पादक व आयातदारांनी आपल्या वस्तूंवर आवश्यक माहिती नमूद करणे बंधनकारक आहे. चुकीची माहिती, अपूर्ण तपशील किंवा ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी हे नियम काटेकोरपणे लागू करण्यात आले आहेत.

सत्रात विशेषतः इलेक्ट्रॉनिक मापे तोलन उपकरणे वापरताना अचूकता राखणे, ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे तसेच आस्थापनांनी तक्रारींचे निवारण करण्यासाठी ई–मेल व दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देणे याबाबत मार्गदर्शन केले गेले.

उत्पादन किंवा आयात केलेल्या प्रत्येक वस्तूवर पूढील प्रामणे माहिती स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले –

१. उत्पादक/आयातदार यांचे पूर्ण नाव व पत्ता (पिनकोडसह)
२. वस्तूचे नाव
३. वस्तूचे निव्वळ वजन/संख्या व एकक विक्री किंमत
४. उत्पादन/आयात केलेला महिना व वर्ष
५. किरकोळ विक्री किंमत (MRP)
६. युनिट सेल प्राईस (Unit Sale Price)
७. ग्राहक तक्रार क्रमांक व ई–मेल

सत्रात उद्योग प्रतिनिधींनी विविध शंका मांडल्या. उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांचे निरसन केले. विशेषतः वस्तूंच्या पॅकेजिंगवरील माहिती, वजनातील अचूकता, आणि ग्राहक तक्रार निवारण प्रक्रियेबाबत सविस्तर महाराष्ट्र राज्य वैध मापन शास्त्र, मुंबईचे नियंत्रक सुधाकर तेलंग (भा. प्र. से.) यांनी मार्गदर्शन केले. वैध मापन शास्त्र नियमांचे पालन करणे हे प्रत्येक आस्थापनाचे कर्तव्य असून, ग्राहकांचा विश्वास मिळवण्यासाठी अचूक व पारदर्शक माहिती देणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. शिवाजी काकडे, सह नियंत्रक, वैधमापन शास्त्र, कोकण विभाग यांनी संगणकीय सादरीकरणा द्वारे औद्योगिक आस्थापनांना देण्यात येणारे विविध परवाने, नामनिर्देशन (पोळपरींळेप) तसेच आवेष्टक नोंदणी इ. बाबत संगणकीय प्रात्यक्षिक दाखवुन तसेच वैध मापनशास्त्र अधिनियम २००९, व त्या खालील तरतुदीबाबत मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे उत्पादीत करण्यात येणा–या आवेष्टीत वस्तूवरील नमूद निव्वळ वजन तपासणीची पध्दत विषद करण्यात आली व घोषीत निव्वळ वजन कमी राहणारा नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. या कार्यशाळेस कोकण विभागांतर्गत येणा–या जिल्हयातील बहुसंख्य उत्पादक/ आवेष्टक उपस्थित होते. या विभागातील अधिकारी सिताराम कदम, उप नियंत्रक, पालघर, राम राठोड, उप नियंत्रक, ठाणे जिल्हा क्र १, संजीव कवरे, उप नियंत्रक, रायगड जिल्हा क्र. १, भारत धुमळ उप नियंत्रक, रायगड जिल्हा क्र. २ व रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हे, सुहास कुटे, उप नियंत्रक, ठाणे जिल्हा क्र. २ व इतर अधिकारी उपस्थित होते.

# घरफोडी चोरी करणा–या पती–पत्नी आरोपींना अटक



**उरण । प्रतिनिधी**

दिनांक ०८/०८/२०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता ते सायंकाळी ०४:०० वा. चे दरम्यान फिर्यादी राजु गुरूनाथ झुगरे वय ४४ वर्षे, रा. दादरपाडा, ता. उरण, जि. रायगड हे त्यांचे घरी नसताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराचे दरवाजाचे कुलूप डुप्लीकेट चावीने उघडून घरामधील बेडरूमचे वॉर्डरूममध्ये ठेवलेले १३,७१,०००/– रूपये किंमतीचे सोन्याचे, चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी करून नेले म्हणून फिर्यादी यांनी उरण पोलीस ठाणेत दिलेल्या तक्रारीवरून गु, रजि. नं. २१३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१(३), ३(५) अन्वये दिनांक ११/०८/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस आयुक्त नवी मुंबई, पोलीस सह आयुक्त,अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ बेलापुर, सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग नवी मुंबई यांनी नमुद गुन्हा गंभीर असल्याने गुन्हयातील चोरास पकडून गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्यासाठी सुचना व मार्गदर्शन केले होते.त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरिक्षक संजय राठोड, पोहवा /९६७ रूपेश पाटील, पोहवा /१७४४ शशिकांत घरत, पोहवा /१९८७ उदय भगत, पोहवा /१९५० गणेश शिंपी, पोना/२७९१ मेघनाथ पाटील, पोना / ३०७८ गंगाराम कचरे असे पथक तयार केले. सदर पथकाने तांत्रिक व गोपनिय माहितीच्या आधारे आरोपी नामे १) नवनीत मधुकर नाईक वय ४५ वर्षे २) स्मिता नवनीत नाईक वय ४१ वर्षे, सध्या रा. रूम नं. १०६ बिल्डीग नं. ०३ सृष्टी अपार्टमेन्ट, उमरोली, ता. जि. पालघर मुळ रा. ०२ विजय निवास, रेडीज चाळ, टेंभीपाडा रोड, शिवाजी नगर, भांडुप (पश्चिम) मुंबई यांना उमरोळी, पालघर, जि. पालघर येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपींकडे सखोल तपास केला असता आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली. सदर आरोपीत यांना नमुद गुन्हयात दिनांक १५/०८/२०२५ रोजी अटक करून त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्यांचेकडून गुन्हयातील चोरी केलेल्या मालमत्तेपैकी १४,५४,९२८/– रूपये किंमतीचे सोन्याचे, चांदीचे दागिने व इतर वस्तू हस्तगत करण्यात आले आहेत.

याव्यतिरीक्त वरील अटक आरोपीनी नवी मुंबई, रायगड, कोल्हापुर या जिल्हयात केलेले गुन्हे उघडकीस आणले आहेत ते खालीलप्रमाणे

१) तळोजा पोलीस ठाणे, नवी मुंबई गुन्हा रजि.क. १३९/२०२५ भान्यास कलम ३०५
२) खालापुर पोलीस ठाणे, रायगड गुन्हा रजि.क.५१९/२०२४ भान्यास कलम ३०५
३) शहापुर पोलीस ठाणे, कोल्हापूर गुन्हा रजि.क. ३१/२०२५ भान्यास कलम ३३१ (३),३०५

याशिवाय आरोपींचा पुर्व पुर्व इतिहास इति पाहता त्यांचेविरूध्द विविध जिल्हयात एकूण २२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये त्यांनी शिक्षा भोगली आहे.सदरची कामगिरी अमित काळे पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ बेलापुर, किशोर गायके सहा. पोलीस आयुक्त पोर्ट विभाग यांचे मार्गदर्शनाखाली हनिफ मुलाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक , राहूल काटवाणी, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस उप निरिक्षक संजय राठोड, पोहवा /९६७ रूपेश पाटील, पोहवा /१७४४ शशिकांत घरत, पोहवा /१९८७ उदय भगत, पोहवा /१९५० गणेश शिंपी, पोना/२७९१ मेघनाथ पाटील, पोना / ३०७८ गंगाराम कचरे यांनी अथक प्रयत्न करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.अशी माहिती हनिफ मुलाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण पोलीस ठाणे नवी मुंबई यांनी दिली आहे.

## संसदीय लोकशाहीचे संरक्षण, सशक्तीकरण आणि भावी पिढ्यांस हस्तांतरण सुनिश्चित करण्यासाठी पीठासीन अधिकारी यांचे योगदान महत्वाचे

# भारतात इ.स.पूर्व काळापासून लोकशाही संकल्पना-प्रा.राम शिंदे

**नवी दिल्ली। प्रतिनिधी**

भारतात इ.स.पूर्व काळापासून लोकशाही संकल्पना रूजलेली आहे. वैशाली गणराज्य, चाणक्य-चंद्रगुप्त कार्यकाळ यावेळी लोकशाही संकल्पनेशी निगडीत अनेक दाखले आपल्याला दिसून येतात. भारतातील संसदीय लोकशाही आणखी बळकट आणि लोककल्याणाभिमुख करण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक असून पीठासीन अधिकारी यांचे योगदान महत्वपूर्ण ठरणारे आहे, असे मत महाराष्ट्र विधान परिषदेचे माननीय सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केले.केंद्रीय विधानसभा (Centralassembly) चे पहिले निर्वाचित भारतीय अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल यांच्या कार्यभार स्वीकारण्याला शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक प्रसंगी नवी दिल्ली येथे अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषद विशेष संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनात आज दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र विधान परिषदेचे माननीय सभापती प्रा. राम शिंदे यांनी भारत - लोकशाहीची जननी या विषयावर प्रभावीपणे आपले विचार मांडले. भारतातील लोकशाहीची ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक मूल्ये व आधुनिक काळातील तिचा अविष्कार या सर्व पैलूंवर त्यांनी आपल्या भाषणात प्रकाश टाकला. १) स्वातंत्र्य संग्राम आणि सामाजिक सुधारणांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील केंद्रीय विधिमंडळातील राष्ट्रवादी नेत्यांची भूमिका, २) भारत-लोकशाहीची जननी आणि





३) कृत्रिम बुध्दीमत्ता आणि पारदर्शकता - प्रशासनात जबाबदारी व विश्वास सुनिश्चित करणे या विषयांवर दोन दिवसीय संमेलनात विचारमंथन झाले. केंद्रीय गृहमंत्री माननीय श्री.अमितजी शाह उद्घाटन सत्रास तर समारोप सत्रास लोकसभा अध्यक्ष माननीय श्री.ओम बिर्ला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. केंद्रीय मंत्री माननीय श्री.ज्योतीरादित्य सिंदीया, माननीय श्री.किरेन रिजिजू, माननीय श्री.मनोहरलाल खट्टर, दिल्ली विधानसभा अध्यक्ष माननीय श्री. विजेंद्र गुप्ता, दिल्लीच्या मुख्यमंत्री माननीय श्रीमती रेखा गुप्ता यांचीही यावेळी भाषणे झाली.माननीय सभापती प्रा. शिंदे यांनी आपल्या भाषणात विठ्ठलभाई पटेलांचे लोकशाहीसाठीचे ऐतिहासिक योगदान अधोरेखित केले. ते म्हणाले की, २४ ऑगस्ट १९२५ रोजी केंद्रीय विधानसभा अध्यक्ष म्हणून भारतीय प्रतिनिधीची निवड होणे हा भारताच्या संसदीय व्यवस्थेच्या इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा होता. त्यांचे शिक्षण आणि वकिली व्यवसायापासून ते बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनशी जोडले गेले होते आणि त्यानंतर केंद्रीय विधानसभा अध्यक्ष या पदावर निवडले गेले. त्यांचे तत्त्वनिष्ठ व निर्भय नेतृत्व हे लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या प्रत्येकासाठी आदर्श ठरते. आपल्या भाषणात पुढे बोलताना माननीय सभापती प्रा. शिंदे यांनी भारतातील लोकशाहीची परंपरा ही पाश्चात्य देशांपेक्षा कितीतरी जुनी आहे. वैशाली गणराज्य हे जगातील पहिले लोकशाही गणराज्य म्हणून ओळखले जाते, याची आठवण त्यांनी करून दिली. भगवान बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात स्थापलेली लोकसंसद असो किंवा तमिळनाडूच्या ग्रामसभेची हजार वर्षे जुनी परंपरा - भारताचे लोकशाही मूल्य पाश्चात्य मॅग्नाकार्टापेक्षा काही शतकांनी आधी रुजलेले आहे. चंद्रगुप्त मौर्य काळात पौर-जनपद संस्था एखाद्या राजा किंवा राजकुमाराला त्याच्या चुकीच्या आचरणामुळे पदावरून हटवू शकत होती, हे नमूद करत त्यांनी लोकाभिमताची परंपरा अधोरेखित केली.माननीय सभापती प्रा. शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काही प्रतिकात्मक कृतींना भारतीय लोकशाही परंपरा सन्मान आणि जतनाचे प्रतीक मानले. सन २०१४ मध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मोदीजींनी संसद भवनास केलेला साष्टांग नमस्कार हा लोकशाहीप्रती असलेली भक्तीभावाची प्रचिती, संसदेला आपण लोकशाहीचे मंदिर मानतो त्या विषयी व्यक्त केलेला आदरभाव आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या संकल्पनेतून सन २०१५ पासून २६ नोव्हेंबरला साजरा होणारा संविधान दिन हा उपक्रम देखील अत्यंत महत्वाचा आहे. लोकशाहीचा हा प्रवास अत्यंत महत्वाचा आहे, असे सांगत माननीय सभापती प्रा. शिंदे यांनी पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांची आठवण करून दिली. आम्ही सर्व पीठासीन अधिकारी यांनी आदरणीय विठ्ठलभाई पटेल यांच्या मार्गदर्शक तत्वांचे स्मरण करूनच निष्पक्ष व निर्भयतेने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आपल्या भाषणाचा समारोप करताना माननीय सभापती प्रा. शिंदे म्हणाले : लोकशाही ही भारतात वैदिक काळापासून अंकुरलेली, प्राचीन पण अखंड प्रवाही परंपरा आहे. ही परंपरा भविष्यातही अनंतकाळ टिकावी, हेच आपल्यासमोरील सर्वोच्च ध्येय आहे. पीठासीन अधिकारी म्हणून आपले कर्तव्य हेच की आपण या मूल्यांचे संरक्षण, सशक्तीकरण आणि भावी पिढ्यांस हस्तांतरण सुनिश्चित करावे.

# शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही-पंतप्रधान मोदी

**अहमदाबाद । वृत्तसंस्था**

शेतकरी, लघु उद्योजक आणि पशुपालकांचे हित हेच माझ्यासाठी सर्वोच्च असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अहमदाबाद येथे दिले. अमेरिका भारतावर २७ ऑगस्टपासून ५० टक्के टॅरिफ लादत असतानाही, भारतातील शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.पंतप्रधान म्हणाले की, कितीही दबाव आला तरीही माझे सरकार लघू उद्योजक, शेतकरी आणि पशुपालकांचे हित जपेल. आम्ही सहनशक्ती वाढवत आहोत आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांचे नुकसान होणार नाही याची मी खात्री देतो असे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा आणि काँग्रेसच्या धोरणांचा उल्लेख करत सांगितले की, जगाने पाहिले आहे की आम्ही पहलगाम नरसंहाराचा बदला २२ मिनिटांत घेतला.



गुजरात ही दोन मोहनांची भूमी आहे - सुदर्शनधारी आणि चरखाधारी. एकाने देशाला सैन्यशक्तीचे प्रतीक बनवले, तर दुसऱ्याने आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला. पंतप्रधान मोदी हे २५ आणि २६ ऑगस्ट रोजी गुजरातच्या दौऱ्यावर असून, त्यांनी अहमदाबादमध्ये सुमारे ३ किलोमीटरचा रोड शो केला. नरोडा ते निकोल मार्गावर झालेल्या या रोड शोमध्ये त्यांनी जनतेला हात हलवत अभिवादन केले.यावेळी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधानांनी या दौऱ्यात ५४७७ कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. यामध्ये साबरमती ते काटोसनदरम्यान धावणाऱ्या नव्या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्यवर्ती पेठांमध्ये वाहतुकीची कोंडी

**पुणे । वृत्तसंस्था**

गणेशोत्सवाला अवघे तीन दिवस शिल्लक राहिले असताना मंडई, शनिपार, तुळशीबाग परिसर, रविवार पेठ, बोहरी आळी परिसरात शनिवारी सकाळपासून वाहतूक कोंडी झाली. त्यातच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या दौऱ्यामुळे वाहतूक अडवून ठेवल्याने स्वतः ठाकरे यांच्यासोबत सामान्य नागरिकांना वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले, तर बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता, मंडई येथे वाहतुकीचा वेग संथ झाल्याने अडचणीतून मार्ग काढून खरेदी पुढे मार्गस्थ व्हावे लागले.



गणेश उत्सवानिमित्त सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची देखावे उभे करण्यासाठी लगबग सुरू आहे. त्यातच शहराच्या मध्यवर्ती पेठांच्या भागात मुख्य बाजारपेठा असून रस्त्यांलगत असलेल्या मंडपांमुळे रस्ते अरूंद झाले आहेत. शनिवारच्या सुट्टीनिमित्त सहकुटुंब साहित्य खरेदी करण्यासाठी कुटुंबासमवेत बाहेर पडलेल्या नागरिकांनी मंडई, तुळशीबाग, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, कसबा या ठिकाणी गर्दी झाल्याने रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या परिसरात वाहनतळांवर मोटारी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने वाहनांच्या रांगा लागल्या.मध्यभागासह उपनगरातील बाजारपेठेत शनिवारी खरेदीसाठी गर्दी झाली होती. कोथरुड, कर्वेनगर, वारजे, हडपसर, कात्रज, धनकवडी, बिबवेवाडी, कोंढवा, वानवडी, हडपसर, केशवनगर, मुंढवा या भागातील बाजारपेठेत गर्दी झाली होती. त्यातच खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी बेशिस्तपणे गल्लीबोळात वाहने लावल्याने वाहतूक विस्कळीत झाल्याचे पहावयास मिळाले. मंडप उभारण्यासाठी बांबू, लोखंडी कमानी, साचे यांचे साहित्य वाहून नेणारी अवजड वाहने रस्त्यांलगत उभी राहिल्याने तसेच हे साहित्य रस्त्यांच्या कडेला पदपथांवर टाकल्याने पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले. जंगली महाराज रस्ता, नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्ता, डेक्कन, आपटे रस्त्यावरही वाहतूक मंदावल्याचे पाहावयास मिळाले.

## पनवेल रेल्वे स्थानकाजवळ एनएमएमटीचा ब्रेक फेल ; चालकाच्या प्रसंगावधानाने वाचले अनेकांचे प्राण

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

पनवेल रेल्वे स्थानकाजवळ एनएमएमटीच्या ७३ नंबर बसचा ब्रेक फेल झाल्याची घटना घडली आहे. चालकाच्या प्रसंगावधानाने मात्र मोठी हानी टळली.

कल्याण येथून पनवेल येथे आलेली एनएमएमटी बस (बस क्रमांक एमएच ४३ - एच- ५३३४) पुन्हा निघाली असता अचानक बसचा ब्रेक फेल झाला.वाहन चालकाच्या हे लक्षात आल्यावर त्याने बसचे स्टेअरिंग रेल्वे स्थानकाच्या संरक्षक भिंतीकडे वळवले. तेव्हा ती बस त्या भिंतीवर जावून धडकली. चालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवले नसते तर समोरच बस स्टॉप मध्ये बसची वाट पाहत असलेले प्रवासी आणि रिक्षा स्थानकाजवळील प्रवासी यांना आपला जीव गमवावा लागला असता. दरम्यान यामध्ये आणखी काही दुर्घटना झाल्याची माहिती मिळाली नसून बसच्या पुढील भागाचे चांगलेच




नुकसान झाले आहे. तरी एनएमएमटी सेवा ही निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे चर्चा ही प्रवाशी करताना दिसून येते.

## ठाणे महापालिका व रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी तर्फे गरजू महिला व तृतीय पंथीयांना ई-रिक्षा वाटप

**मुंबई । प्रतिनिधी**

गरजू महिला आणि तृतीय पंथीय व्यक्ती यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी ठाणे महापालिका व रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी यांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात दोन ई-रिक्षांचे वाटप महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. या कार्यक्रमास, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त अनघा कदम, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२चे माजी गव्हर्नर दिनेश मेहता, रोटरी लेकसिटीच्या अध्यक्षा दिपाली महिंद्रा, रोटेरियन अनिरूध्द आदी उपस्थित होते.ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिका, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी, एटॉस कंपनी व समर्थ भारत व्यासपीठ यांच्या



संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्याच अंतर्गत, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीतर्फे गरजू आणि स्वयंरोजगाची इच्छा असलेल्या महिला तसेच तृतीय पंथीय यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी ई-रिक्षा ( वीजेवर चालणारी रिक्षा) चे वाटप करण्यात आले. आतापर्यंत एकूण १५ ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी चार ई-रिक्षा तृतीयपंथीयांना देण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या रिक्षाचालकांना शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र हा सुसंस्कृत! जरांगेंनी मर्यादेत बोलावे

**मुंबई । प्रतिनिधी**

बीडमध्ये झालेल्या सभेत मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईविषयी अपमानास्पद भाष्य केले. यावरून भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आक्रमक होत देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतीत एवढा व्यक्तीद्वेष आहे कि जरांगेंनी आईवरून शिव्या देऊन मुख्यमंत्री यांच्या आईचा अपमान केला आहे. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. सुसंस्कृत आहेत. तुमच्यासारखे अडेलतट्टू विनासंस्काराची भाषा ते करत नाहीत. जरांगे मुख्यमंत्री यांना अपशब्द बोलता मग तुम्हाला आम्ही सुपारीखोर, चिंधीचोर बोलू का? आपल्या मर्यादेत बोला. मराठा समाज महाराष्ट्रात मोठा आहे, या समाजाची महाराष्ट्रात ताकद आहे. ती माझ्या बापाचीच मालकी आहे, अशा भूमिकेतून बोलणार असाल तर तुम्हालाही आम्ही सोडणार नाही, असा थेट इशाराच जरांगेंना दिला.



पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले कि, महाराष्ट्र हा सुसंस्कृत आहे. मराठा समाजावर छत्रपती शिवाजी महाराजांचे संस्कार हे सुसंस्कृतपणाचे आहेत. परंतु देवेंद्र फडणवीस यांची पैदास काढणे हा विकृतपणा आहे. जरांगे कसली औलाद आहे, अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित होतोय. समाजासमाजात वाद निर्माण करायचे, कायदा सुव्यवस्था भंग करायची आणि आपण जसेकाय मराठा समाजाचे मालक आहोत या अविर्भावात आईवरून शिव्या देणार असाल तर असा विचार छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारा कुठलाही व्यक्ती करू शकत नाही, असेही दरेकर म्हणाले.

तसेच जरांगेंनी आंदोलन करावे, आपल्या मर्यादेत, क्षमतेत करावे आम्हीही त्या मातीतील, रक्ताचे आहोत त्यामुळे खबरदार देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या आईवरून काही बोललात तर जशास तसे उत्तर देणारी यंत्रणा आम्हाला उभी करावी लागेल. आपल्या प्रश्नावर लक्ष ठेवा, चर्चा करा. मुख्यमंत्री सहनशील आहेत. ते चर्चा करतील. आणखी कायकाय पर्यायी मार्ग काढता येतील त्यासाठी प्रयत्न करतील, असेही दरेकर म्हणाले. त्याचबरोबर उद्धव ठाकरे अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना मराठा समाजाचे आरक्षण टिकविण्यासाठी काही केले नाही, केवळ दुर्लक्षच केले. ३०-४० वर्ष ज्यांनी या राज्याचे नेतृत्व केले, मराठ्यांच्या नावावर राजकारण केले त्यांनाही मराठ्यांविषयी कधी आपुलकी वाटली नाही. आता जरांगेंच्या खांद्यावर बंदूक ठेवून देवेंद्र फडणवीस यांना निशाणा करताहेत. फडणवीस ज्या पद्धतीने विकास करताहेत, शेतकऱ्यांसाठी काम करताहेत, समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करताहेत त्या हतबलतेतून हे मोठे राजकीय षडयंत्र आहे, असा आरोपही दरेकर यांनी केला.

**यामागे शंभर टक्के मोठे राजकीय षडयंत्र**

दरेकर म्हणाले कि, यामागे शंभर टक्के मोठे राजकीय षडयंत्र आहे. योग्य वेळी ते बाहेर येईलच. पडद्यामागचे खरे सूत्रधार कोण आहेत, या सगळ्याला अर्थपूरवठा कोण करतेय, कोण व्यवस्था लावतेय. कारण देवेंद्र फडणवीस राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रात भक्कम झालेत. राज्याच्या राजकारणावर त्यांची कमान, पक्की मान बसलीय. त्यामुळे त्यांना निवडणुकीत हरवू शकत नाही, राजकीय दृष्ट्या सामोरे जाता येत नाही, मग असा रडीचा डाव खेळून कुणाच्यातरी खांद्यावर बंदूक ठेवायची आणि आपला डाव साध्य करायचा असा प्रयत्न असल्याचा आरोपही दरेकरांनी केला

# अण्णाभाऊ साठे व वामन दादा कर्डक यांच्या जयंती निमित्त कवी संमेलनाचे आयोजन–चंद्रप्रकाश शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

संविधान अमृत वर्षत सा.स.अण्णाभाऊ साठे व महाकवि वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दि.३१.०८.२०२५. रोजी संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड जि.परभणी येथे सकाळी११.००ते सांय.५.०० पर्यत राज्य स्तरावरील कविसंमेलन आयोजित करण्यात आलेलेआहे.कविसंमेलनाचे उद्धघाटक धी. भारत सातपुते (सुप्रसिद्ध साहित्यिक लातुर) हे आसुन प्रमुख पाहूणे धी.डॉ.मारुती कसाब (म.फुले महाविद्यालय अहमदपुर जि.लातुर) , धी. प्रा.डॉ.किर्तीकुमार मोरे (मराठी विभाग प्रमुख संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड जि.परभणी)हे राहाणार आहेत.तर उद्धघाटन व प्रकाशन सत्राचे अध्यक्ष स्थान धी.छगन घोडके (उपाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.) हे भुषवणार आहेत.सुत्र संचालन धी.डॉ.हरिष रणबावळे सवनेकर (राज्य कर्यकारिणी सदस्य मा.प्र.सृ.सा.प.महा.)तर प्रास्ताविक धी.मुरलीधर रणखांब (जिल्हा सचिव मा.प्र.सृ.सा.प. परभणी)हे करतील आभारप्रदर्शन धी.एम.बी.गोटमुकले (तालुका सचिव मा.प्र.सृ.सा.प. गंगाखेड जि.परभणी) हे करणार आहेत.यावेळी



कविवर्य धी.चंद्रप्रकाश शिंदे यांच्या मानवतावाद पेलताना कविता-संग्रहाचे प्रकाशन होणार आहे. राज्य स्तरावरील कविसंमेलनात प्रतिभासंपन्न प्रसिद्ध कविचा सहभाग होणार आहे. कविसंमेलनाचे अध्यक्ष धी.डी.जी.वाळवंटे (संघटक मा.प्र.सृ.सा.प.महा.) हे आसुन सुत्रसंचालन धीमती एडवोकेट सृष्टी लोखडे(जिल्हाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प. छ.संभाजीनगर )व धी.पंकज शिंदे(जिल्हा सचिव मा.प्र.सृ.सा.प.छ. संभाजीनगर )हे करतील.व आभारप्रदर्शन धी.राम सांवत (तालुका अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प. गंगाखेड जि.परभणी)करुन संमेलनाची सांगता करणार आहेत.तरी समस्त साहित्यिकांनी व साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे आसे नम्र निवेदन धी. भीमराव सरवदे (उपाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.), धी.प्रोफेसर विठ्ठल जाधव कोषाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.) धी.राजू वाघमारे (सह सचिव मा.प्र.सृ.सा.प.महा.), धी.योगीराज कोचाडे (सह सचिव मा.प्र.सृ.सा.प.महा.) धी.कोंडबा हटकर (सह सचिव. मा.प्र.सृ.सा .प.महा.)धी.प्रा.अरुण कांबळे बनपुरीकर (संघटक मा.प्र.सृ.सा.प.महा.) धीमती सुरेखा कांबळे,सुभाष गवळी,धी.मधुकर पवळे, धी.डी.वाय. टिळक धी.प्रा.डॉ.बाळासाहेब जावळे(राज्य कार्यकारिणी सदस्य मा.प्र.सृ.सा.प.महा.) इ.नी केले आहे.

# शासकीय आश्रम सरी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील शासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा सरी येथे ग्रामपंचायतीने सामाजिक बांधिलकी म्हणुन गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक देऊन सत्कार केला. शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सरी येथे नुकताच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. ग्रामपंचायत सरी यांच्याकडून या वर्षी शासकीय आश्रम शाळेस ३९,९९७ रुपयांचा धनादेश देण्यात आला. यासाठी लोक नियुक्त सरपंच सौ. साकराबाई दिलीप वसावे, उप सरपंच अमिला रुमा वसावे व ग्रामविकास अधिकारी दिवाकर पाडवी, माजी पं.स.सदस्य जयवंती विनोद वसावे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप वसावे यांच्या प्रयत्नाने शाळेस हे सहकार्य लाभले.

शैक्षणिक वर्ष २०२४- २५ मध्ये इयत्ता १० वीत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा मुलींमध्ये प्रथम आलेल्या



कु. सुनंदा विरसिंग वसावे या विद्यार्थिनीला ११,१११/ रुपये, शाळेत इयत्ता १० वीत प्रथम आलेल्या कु. कल्पना वनसिंग वसावे हिला ९९९९ /रुपये, तर द्वितीय क्रमांक मिळविलेल्या कु.वर्षा राज्या पाडवी हिला ७,७७७ /रुपये व तृतीय क्रमांक मिळविलेल्या जीवन बामण्या पाडवी यांना ५,५५५ /रुपयांचा धनादेश लोकनियुक्त सरपंच साकराबाई दिलीप वसावे व सामाजिक कार्यकर्ते दिलीप वसावे यांच्या हस्ते देण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सरपंच साकराबाई दिलीप वसावे यांनी विद्यार्थ्यांनी सर्वच विषयात प्राविण्य मिळविले पाहिजे असे सांगुन आजचे युग हे स्पर्धेचे युग असल्याने अभ्यासा बरोबर खेळ, व्यायाम याकडे ही लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत पुढील वर्षी ही अधिक पारितोषिके कशी मिळविता येतील यासाठी शाळेने देखील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक डी. एच. वसावे यांनी सत्कार कर्ते सर्व ग्रामस्थ, सरपंच व सदस्यांचे आभार मानले. सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक माध्यमिक शिक्षक राजेंद्र पाडवी यांनी केले सूत्रसंचालन प्रा. डी. बी. वसावे व ओ. एस. पाडवी यांनी तर उपस्थितांचे आभार एम. एस. वळवी यांनी मानले कार्यक्रमास गावातील ग्रामस्थं चेतन वसावे, अंतरसिंग पाडवी, रावल्या पाडवी, रोडत्या वसावे, खेमा वसावे, सौ.मात्तीबाई नोबल्या वसावे, सुरतीबाई वसावे, सौ.रमीला वसावे, सौ.नोवीताई पाडवी, सौ.ममता वसावे, मोग्या वसावे, पुरता वसावे, जोतन्या वसावे आशा वसावे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थं मोठ्या संख्येने उपस्थित होते. .

# समृद्धी महामार्गावर भीषण धडक ट्रक अपघातात एक ठार, एक जखमी

**वैजापूर । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर सोमवारी मध्यरात्री भीषण अपघात घडला. जांबरगाव शिवारात भरधाव आयशर ट्रकने समोरील ट्रकला जोरदार धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला. या अपघाताने महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आयशर ट्रक (क्रमांक एमएच २८ बीबी ८०८१) बुलढाण्याहून मुंबईकडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली. रात्रीच्या वेळी झोप येणे किंवा तांत्रिक बिघाडामुळे अपघात झाला असावा, अशी प्राथमिक शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, तपासाची चक्रे फिरविण्यात येत आहेत. वाहनांची तपासणी आणि चालकाची चौकशी सुरू आहे. तसेच महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

गेल्या काही दिवसांत समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरू असून, भरधाव वाहने, चालकांचा निष्काळजीपणा आणि रस्त्यावरील




पार्किंग या कारणांमुळे दुर्घटनांचे प्रमाण वाढत आहे. प्रवासी व स्थानिक नागरिकांनी महामार्गावर पोलिस गस्त वाढविणे आणि कठोर सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

# गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयाच्या लेझीम पथकाने जिंकले तळोदेकरांचे मन

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरातील गुलाबबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालयाच्या लेझीम पथकाने आपल्या शिस्तबद्ध सादरीकरण आणि जोशपूर्ण हालचालींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बिरसा मुंडा चौक ते कन्या विद्यालय या मार्गावर रिमझिम पावसातही विद्यार्थिनींनी केलेल्या या अविस्मरणीय सादरीकरणाचे तळोदेकरांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

विशेष पोशाखात सज्ज असलेल्या या पथकाने ढोल ताशांच्या गजरात मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढली. यावेळी त्यांच्या तालबद्ध हालचालींमधील दमदारपणा आणि नजाकत पाहून नागरिक मंत्रमुग्ध झाले. अनेकांनी विद्यार्थिनींच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चेतन पवार, उपाध्यक्ष प्रतिभा मगरे, तसेच संचालक



आणि इतर मान्यवर उपस्थित होते. त्यांनी पथकाचे कौतुक करताना विद्यार्थिनींचा उत्साह आणि शिक्षकांचे परिश्रम महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक मिलिंद ढोडरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. लेझीम पथक प्रमुख दिलीप तडवी, सांस्कृतिक समिती सदस्य दिनेश मराठे, योगेश पाटील, वैशाली देवरे, अनिल इंदिस, भाग्यश्री सागर, ज्योती महाजन, हरिश्चंद्र कोळी, उल्हास मगरे तसेच कै. आप्पासाहेब भिकाभाऊ महाजन प्राथमिक विद्या मंदिराचे शिक्षकवृंद आणि इतर सहकाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

शहरात या सादरीकरणाची खूप चर्चा होत असून, कन्या विद्यालयाचे लेझीम पथक म्हणजे ताल, शिस्त आणि संस्कृतीचा संगम अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# महालक्ष्मी (गौराईला) जन्म देणारे सोनेसांगवी गाव केजच्या आकर्षक मुखवट्यांना महाराष्ट्र भरातून मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सोनेसांगवी हे १९८० साली मांजरा प्रकल्पा मुळे पुनर्वसीत झालेले गाव.अडीचशे कुटुंब,व गावाची तेराशे लोकसंख्या असलेले गाव.त्यावेळी गावात रोजगार अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असे. गावातील दहा ते अकरा कुटुंब पारंपारिक मडके तयार करण्याचा व्यवसाय करत.जेष्ठ कारागीर माणिक इटकर यांनी ही संधी ओळखून लक्ष्मी मुखवटे,गणेश मूर्ती, बैल,खेळणी तयार करण्यास सुरुवात केली कलाकुसर शिकून गुणवत्तापूर्ण सुंदर मुखवटे तयार करण्यास अनेक कुटुंब पुढे आली. लक्ष्मीच्या मुखवट्याची आता प्रचंड मागणी वाढलीआहे.सोनेसांगवी हे महाराष्ट्रातील अनेक भागात महालक्ष्मी मुखवट्यांचा पुरवठा करत आहेत महालक्ष्मी यांना जन्म देणारे गाव म्हणून सोने सांगवी करांची ओळख होत झाली आहे.बाजारपेठेत या मूर्तींना मोठी



मागणी आहे.


८० च्या दशकानंतर शेती व अन्य मजुरीची कामे मिळत नव्हती या काळात संधीओळखली आणि अनेक कुटुंबाने या व्यवसायात कौशल्य विकसित केले.गुणवत्ता निर्माण केली.आज या कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात यामधून नफा मिळत आहे.१० ते ११ कुटुंब ५५ ते ६० कुटुंबीय यांना आता या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळत आहे .

# 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमांतर्गत नंदुरबार जिल्ह्यात आरोग्य शिबिरांचे आयोजन

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयाने 'श्रीगणेशा आरोग्याचा' हे विशेष आरोग्य अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत २७ ऑगस्ट ते ०५ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध गणेश मंडळांमार्फत सामुदायिक आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.

जिल्ह्यातील गरजू रुग्णांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा, यासाठी आरोग्य शिबिरांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिल्या आहेत. नुकत्याच झालेल्या नियोजन बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाचे अध्यक्ष डॉ. तुषार धामणे, जिल्हा समन्वयक डॉ. योगेश सरताळे यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.



या उपक्रमामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील रुग्णांना तपासणी आणि उपचारासाठी उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

# जिव्हाळ्यातील लक्ष्मीबाई गिरी यांचे दुःखद निधन

**बीड । प्रतिनिधी**

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये मागील सहा महिन्यापूर्वी आलेल्या या लक्ष्मीबाई गिरी, राहणार जामखेड. या आजीबाईचे



दिनांक २७/०८/२५ रोजी जामखेड येथील रुग्णालया मध्ये हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. दोन दिवसापूर्वी जिव्हाळा केंद्रातून त्या आपल्या मुलीकडे सणासाठी गेल्या होत्या. जाताना त्यांनी आमचा निरोप घेतला आणि सांगितले की मी आठ दिवसानंतर येणार आहे. माझी काळजी करू नका आणि आम्ही त्यांना जाण्याची परवानगी दिली. आणि आज ही दुःखद घटना घडली. त्यांच्या मुलीच्या गावी घडली. त्यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन करून त्यांना जिव्हाळा परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली पण करण्यात आली त्यांचा जातेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# केज तालुक्यातील दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते मच्छिंद्र वाघमारे यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विडा येथील दलित चळवळीतील ज्येष्ठ नेते मच्छिंद्र मुगाजी वाघमारे (वय अंदाजे ६५) यांचे सोमवारी सकाळी अंबाजोगाई येथे उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने तालुक्यातील दलित चळवळ, सामाजिक कार्य क्षेत्र आणि ग्रामीण भागातील वंचित समाजातून हळहळ व्यक्त होत आहे.



१९८०-९० च्या दशकात सामाजिक न्यायासाठी धडपड करणारे नेते म्हणून वाघमारे यांचे नाव आदराने घेतले जात असे. त्यांनी विडा परिसरातील १० कुटुंबांना गायरान जमीन नावाची करून देण्यासाठी ठाम लढा दिला होता. याचबरोबर २० हून अधिक कुटुंबांना झोपडपट्टीसाठी ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करून देण्याचे श्रेय त्यांच्या नेतृत्वाला जाते. वंचित समाजातील प्रत्येक घटकासाठी हक्काचे घरकुल, जमीन आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक चळवळींचे नेतृत्व केले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक चळवळीतले एक लढवय्ये व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना तालुक्यात व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077